# इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०१४-१५

## प्रसिद्धीपत्रक

दिनांक २५.७.२०१४

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील कॉलेज मध्ये इयत्ता ११ वी ऑनलाईन पध्दतीने प्रवेश प्रक्रियेच्या ३ फे-या झाल्या. तसेच ऑफलाईन पध्दतीने कॉलेज स्तरावर प्रवेशासाठी कनिष्ठ महाविद्यालयांना सूचना देण्यात आलेल्या होत्या. यानंतर अजूनही काही मुले प्रवेशापासून वंचित राहिली असतील अशा विद्यार्थ्यांसाठी प्रवेश प्रक्रिया समूपदेशन फेरी दिनांक ३१/७/२०१४ रोजी आबासाहेब गरवारे कॉलेज, कर्वेरोड, पुणे येथे गुणवत्तेप्रमाणे होणार आहे. यामध्ये-

१. ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश अर्ज भरुनही कोठेच प्रवेश मिळाला नाही.

२. ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेनुसार कॉलेज मिळाले परंतू प्रवेश घेता आला नाही

३. ज्या विद्यार्थ्यांच्या पालकांच्या बदलीमुळे तसेच बाहेरगावाहून पुण्यात शिक्षणासाठी आले परंतू ऑनलाईन व ऑफलाईनद्वारा प्रवेश घेता आला नाही.

४. ज्यांनी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरला नाही त्यामूळे कोठेच प्रवेश मिळाला नाही असे विद्यार्थी.

अशा विद्यार्थ्यांनी खालीलप्रमाणे कागदपत्रे सोबत आणावीत.

- ❖ ऑनलाईन मध्ये केलेल्या मूळ प्रवेश अर्जाची झेरॉक्स प्रत (ज्यांनी ऑनलाईन अर्ज केला होता त्यांनी)
- ❖ मूळ शाळा सोडल्याचा दाखला व त्याची सत्यप्रत.
- ❖ इ. १० वी ची मूळ गुणपत्रिका व त्याची सत्यप्रत.
- ❖ जातीचे प्रमाणपत्र (स्वतःचे नसेल तर वडीलांचे / भावाचे / बहिणीचे इ.) व त्याची सत्यप्रत.
- ❖ ऑफलाईन मध्ये कॉलेजला अर्ज केला असल्यास त्याची पोहोच.

## विद्यार्थिनी साठी :-

- ❖ ज्या विद्यार्थीनींना घरापासून ७ कि.मी. किंवा त्यापेक्षा जास्त कि.मी. अंतरावरचे कॉलेज मिळाले आहे. त्या विद्यार्थिनींनी शाळा सोडल्याचा दाखला व गुणपत्रिका व ऑनलाईन प्रवेश अर्जाच्या झेरॉक्स प्रती आणाव्यात. विद्यार्थिनींनी मूळ कागदपत्रे आणू नये.

वरील विद्यार्थी व विद्यार्थिनींनी दिनांक ३१/७/२०१४ रोजी सकाळी १०.३० वा.आबासाहेब गरवारे कॉलेज मध्ये उपस्थित रहावे.

### दिनांक ३१/७/२०१४ रोजी खालील वेळापत्रकाप्रमाणे कामकाज होईल.

सकाळी ११.०० ते ११.३० सूचना.

११.३० ते १२.०० विद्यार्थ्यांकडून फॉर्म भरुन घेणे.

१२.३० ते २.०० फॉर्म तपासणे व प्रवेश प्रक्रिया.

दुपारी २.०० ते २.३० मधील सुट्टी.

३.०० ते ६.०० फॉर्म तपासणे व प्रवेश प्रक्रिया.

कृ.मा.प.

फॉर्म स्विकारणे,फॉर्म तपासणे,प्रवेश देणे इत्यादी प्रक्रिया संबंधी खालील प्रमाणे नियोजन करण्यात आले आहे.

१) **'असेंब्ली हॉल', आबासाहेब गरवारे कॉलेज**, - ऑनलाईन प्रवेश अर्ज भरुनही कोठेच प्रवेश मिळाला नाही अशा विद्यार्थ्यांनी येथे उपस्थित रहावे.

२) **'ए. व्ही. हॉल', आबासाहेब गरवारे कॉलेज**, - ऑनलाईन फॉर्म भरुन प्रवेश मिळाला पण घेतला नाही तसेच फॉर्म भरला नाही व प्रवेश मिळाला नाही अशा विद्यार्थ्यांनी येथे उपस्थित रहावे.

३) **सावरकर हॉल, रुम नं. १५ गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्स** – ७ कि. मी. पेक्षा जास्त अंतरावरील कॉलेज मिळाले आहे अशा विद्यार्थिनींनी येथे उपस्थित रहावयाचे आहे.

४) **रुम. २८ विमलाबाई गरवारे हायस्कूल ज्युनि कॉलेज, पुणे** - ए.टी.के.टी. च्या विद्यार्थ्यांनी येथे उपस्थित रहावे.

25/7/14

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे १